ISSN 2249-894X Impact Factor : 3.8014 (UIF) Volume - 6 | Issue - 2 | November - 2016

Review Of Research

# आदिवासी साहित्याच्या प्रेरणा, स्वरुप व वैशिष्ट्ये

**प्रा. परमेश्वर हटकर**
**मराठी विभाग, माऊली महाविद्यालय, वडाळा, ता. उत्तर सोलापूर, जि.सोलापूर**

## प्रस्तावना :-

प्रगत संस्कृतीपासून अलिप्त राहिलेले त्या प्रदेशातील मूळचे रहिवासी म्हणजे 'आदिवासी' हे आदिवासी डोंगराळ प्रदेशात तुरळक वस्ती करुन राहातात. या आदिवासींनाच वनवासी, वन्यजाती, गिरिजन असे सुध्दा म्हणतात. ''आदिवासी म्हणजे धरतीची लेकरे, निसर्गाच्या कुशीत जीवन जगणारी.'' आदिवासींच्या विविध जमाती आहेत आणि त्या जमातीनुसार त्याच्या वेगवेगळ्या बोली आहेत. प्राचीन भारतीय ग्रंथांमध्ये आदिवासींचे उल्लेख आले आहेत. उदा. एकलव्य, शबरी इत्यादी. सन १७७८ ते १९४७ पर्यंतच्या काळात आदिवासींनी पिळवणुकीविरुध्द जवळ-जवळ ७५ बंडे केली. आदिवासींच्या जीवनावर सर्वात आधी फ्रेंच लेखक रुसो याने १७ व्या शतकात आपली मते व्यक्त केली. त्यामुळे अमेरिका, आफ्रिका, आशिया आणि ऑस्ट्रेलिया खंडांतील आदिवासींचे शास्त्रशुध्द अध्ययन सुरु झाले. या सर्व प्रयत्नांमुळे आदिवासी जीवनाबद्दल जनसामान्यांत संवेदना निर्माण झाल्या. ''भारताच्या एकूण लोकसंख्येच्या ८ टक्के आदिवासी आहेत. महाराष्ट्र राज्यामध्ये या जमातींचे प्रमाण ९ टक्के इतके आहे. महराष्ट्रातील गोंड, कोरकू, भिल्ल, महादेव कोळी, वारली, कंवार, परधान, हळबा, माडिया इत्यादि आढळतात. त्यांपैकी मेळघाटमध्ये कोरकू, भिल्ल व गोंड इत्यादि जमाती वास्तव्य करुन आहेत. आदिवासींचे जीवनवास्तव ही आदिवासी साहित्याची पार्श्वभूमी असून त्यातील समस्या व विकासातील आव्हानांचा विचार प्रस्तुत निबंधात करीत आहे. त्यातही आदिवासी स्त्रीच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक स्थानाबद्दल विशेषत्वाने जाणून घ्यावयाचे आहे.



## आदिवासी साहित्याचे स्वरुप :-

मराठी साहित्यात निर्माण होणाऱ्या नवनवीन साहित्य प्रवाहाकडे पाहिल्यास प्रत्येक साहित्य प्रवाहाला त्या त्या समाजाचे अविभाज्य अंग प्राप्त झालेले दिसून येते. ग्रामीण साहित्यात ग्रामीणांचे, दलित साहित्यात दलितांचे तर स्त्रीवादी साहित्यात स्त्रियांच्या भाव-भावनांची मांडणी केल्याचे निदर्शनास येते. आदिवासी साहित्याच्या स्वरुपाबाबत विचार करता, आदिवासींच्या अनुषंगाने वेगवेगळ्या प्रकारचे संदर्भ येताना पहावयास मिळतात.

आदिवासी हे भारतभूमीचे आदिपुत्र आहेत. हजारो वर्षांपासून आदिवासी शहरी संस्कृतीच्या प्रतिक्षेत भिकाऱ्यासारखा उभा आहे. आदिवासींच्या सभोवती निर्माणा होणारे साहित्य हे आदिवासींचे साहित्य नाही.

आदिवासी साहित्य आदीवासी समाजाच्या चळवळीचे साहित्य आहे.

आजही ९५ टक्के आदिवासी जंगलात राहतात. इतिहासात तो जंगलचा राजा होता. त्याची स्वतःची जंगले आणि मिनी होत्या. मात्र ब्रिटीशांच्या जंगल कायद्याने त्यांचा निसर्ग संपत्तीवरील हक्क राहू दिला नहाी. मूळचा जंगलचा राजा आपल्याच स्वतःच्या जमिनीवर कंदमुळांच्या आधाराने दारिद्रयात जगतो आहे.

ब्रिटीशांनी सार्वत्रिक शिक्षणाचे धोरण अवलंबिले; मात्र हे शिक्षण आदिवासींपर्यंत म्हणावे असे पोहोचले नाही. त्यातूनही काही आदिवासी मुले शाळेत गेली तर त्यातील २-३ टक्के मुले दहावीपर्यंत शिक्षण घेऊ शकतात. आदिवासी समाजाला हजारो वर्षे व्यक्तिगत आणि सामाजिक जीवनात स्वातंत्र्य मिळाले नाही. त्याचे चित्रण मराठी साहित्यात आले नाही.

आदिवासी साहित्याच्या उगमाचा विचार करता आदिवासी लोककथा, लोकगीते, लोकनाट्ये, त्यातील बोली भाषा, त्या बोली भाषेतील शब्द हेच आदिवासी साहित्य होय. आदिवासी साहित्यांचा उगम कोठे आणि केव्हा झाला हे कोणालाही सांगता येणार नाही म्हणून आदिवासींच्या जन्माबरोबरच त्यांच्या साहित्याची निर्मिती झाली असे म्हणावे लागते. कारण हजारो वर्षे आदिवासी समाज आपल्या समृध्द साहित्य संपदेवर अनाधिकाळापासून पिढ्यानपिढ्या जगलेला आहे. अशा या साहित्याचा गौरव करताना डॉ. गोविंद गारे म्हणतात, “ आदिवासी साहित्य हे खऱ्या अर्थाने सर्व साहित्याचे मूळच मानले पाहिजे’’

मराठीत बरेचसे आदिवासीतेतर साहित्यिकांचा समावेश आहे. त्यातले काही साहित्यिक चळवळ पुढे जाण्यासाठी संशोधक, तर काही पदव्या मिळविण्यासाठी संशोधन, तर काही पैसा मिळविण्यासाठी पुस्तके, तर काही निव्वळ साहित्य निर्मितीसाठी साहित्य असे आलेले आहे. बिगर आदिवासी साहित्यिक आदिवासी नसल्यामुळे त्यांच्या साहित्यात आदिवासी जीवनातले ताण-तणाव, भावना, मानसिक संघर्ष, आनंद, मोह इत्यादींना न्याय मिळणे शक्य नाही. स्वातंत्र्योत्तर शिक्षित आदिवासी तरुण आपली अस्मिता शोधता स्वतः हातात लेखणी घेऊन साहित्य लिहू लागला आहे आणि यूनच निर्माण होणारे साहित्य खरे आदिवासी साहित्य असेल असा आशावाद व्यक्त होताना दिसतो.

आदिवासी साहित्य स्वरुपाचा विचार करता जे आदिवासी आपल्या जमातीतून आलेले आहेत त्यांनी आपले जीवन संदर्भ, वास्तव पध्दतीने मांडलेले असून त्यांच्या साहित्यात आदिवासींचे जीवन, त्यांचा धर्म, संस्कृती, त्यांच्या रुढी परंपरा, सण, उत्सव, देवदेवता, सामाजिक व आर्थिक प्रश्न, त्यांच्या समृध्द भाषा, बोली भाषेतील जीवनानुभव मांडलेले आहेत. स्वांत्र्यानंतर आदिवासीमधून शिकून सवरुन एक नवी पिढी निर्माण झाली. या नवशिक्षित आदिवासी तरुणांनी नव्या जाणिवेने आपल्या साहित्यनिर्मितीस सुरुवात केलेली आहे. आदिवासी हा घनदाट अरण्यात अर्धनग्नावस्थेत राहणारा नरभक्षक, कच्चे मांस खाणारा, कावळ्यापेक्षा काळा, धरतीचे पापी, खुजे, चपट्या नाकाचे लुटारु, राक्षस वगैरे उपहासात्मक केलेल्या वर्णनाचे आदिवासी साहित्य निषेध कताना पहावयास मिळते.

## स्वातंत्र्यपूर्व काळातील आदिवासींच्या चळवळी :-

आदिवासींना बरेच काही दिले आहे. संघर्षात्मक व रचनात्मक कार्य करणाऱ्या अनेक लहान-मोठ्या काग्रकर्त्यांची फळी त्यातून निर्माण झाली आहे. महाराष्ट्रापुरतेच सांगायचे, तर ठक्करबाप्पांपसून ते आचार्य भिसे, नारायणसिंग उइके, अनुताई वाघ, गोदाताई परुळेकर, दादासाहेब बिडकर, जयंतराव नेटावदकर, अंबरसिंग महाराज, काळूराव दोधडे, विवेक पंडित, बाबूराव मडावी, मधुकर पिचड यांच्यापर्यंत अनेक कार्यकर्त्यांची जडणघडण झालेली आहे. त्यांनी उभ्या केलेल्या चळवळींचा आणि कार्याचा सात्यिनिर्मितीत उपयोग होणार नाी? दुसऱ्यांचे अनुभव, अनुभूती, प्रेरणा उसन्या घेऊन आदिवासी साहित्याची चळवळ किती दिवस चालणार आहे? याचा विचार आदिवासी समाजातून निर्माण होणाऱ्या नवलेखकांनी करण्याची वेळ आलेली आहे.

## स्वातंत्र्योत्तर काळातील आदिवासींच्या चळवळी :-

आदिवासी चळवळी आणि सात्यिनिर्मिती या विषयाच्या संबंधात विचार प्रगट करण्यापूर्वी थोडीशी पूर्वपीठिका मांडण्याचा माझा हा प्रयत्न होता. देश स्वतंत्र झाला, जनता सार्वभौम झाली, त्याचबराबर जंगल, दऱ्याखोऱ्यांत राहणारा आदिवासीही देशाचा स्वतंत्र व सार्वभौम नागरिक झाल. भारतीय संविधानाने भारतीय नारिकांना जे संरक्षण आण हक्क

दिले, ते सर्वसामान्य आदिवासीलाही प्राप्त झाले. विशेष म्हणजे आदिवासींची विशिष्ट परिस्थिती लक्षात घेता, त्यांना संविधानाद्वारे विशेष संरक्षण व अधिकारही मिळाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर व पू. ठक्करबाप्पा यांच्यासारख्या द्रष्ट्या नेत्यांचे हे ऋण आदिवासी कधीही उतराई होऊ शकणार नाही. आदिवासी जंगली आणि शिक्षित, अडाणी आहेत. त्यांना सर्व हक्क व अधिकार प्रदान करावेत की नाहीत? त्यांना त्यांचा वापर करता येईल का नाही? असाही त्याकाळी एक विचारप्रवाह हेता, परंतु थोर नेत्यांच्या प्रयत्नामुळे हा विचारप्रवाह निर्माण झाला आणि तेथेच संपला. परिणामतः संविधानाद्वारे आदिवासींची शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक मागासलेपणातून सोडवणूक करण्याचे सर्व स्तांवर प्रयत्न सुरु झाले. हे जरी खरे असले, तरी आदिवासींचे जे जटिल प्रश्न होते... विशेषत, जमीन, जंगल, जल, सावकारी, शोषण इत्यादी, त्यांची तातडीने सोडवणूक होण्यासारखी परिस्थिती निर्माण होऊ न शकल्याने देशभर आदिवासींनी संस्था- संघटनांद्वारे चळवळ, लढे आणि जनआंदोलने सुरु केली.

## आदिवासी साहित्याच्या प्रेरणा :-

आदिवासी साहित्य प्रवाहातील आदिवासी साहित्याच्या प्रेरणांचा विचार करता त्यामध्ये विविधता असल्याचे निदर्शनास येते. आदिवासी साहित्यिकांनी ज्या प्रेरणा मान्य केलेल्या आहेत. बिरसा मुंडा, जोतीाव फुले, तंट्या भिल्ल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, निसर्ग, संस्कृती, ऐतिहासिकता, समाजप्रबोधन यांचा समावेश होतो.

पौराणिक महाकाव्यातील एकलव्य ही एक व्यक्तिरेखा लक्षवेधी वाटते. आदिवासी समाजाची धनुर्धारी परंपरा त्याने प्रामाणिकपणे जोपासली. मात्र अर्जुनापेक्षा श्रेष्ठ धनुर्धारी होत आहे असे लक्षात येताच त्याचा उजवा अंगठा दक्षिणा म्हणून कापून घेण्यात आला. एखादा आदिवासी निष्ठेने ज्ञान घेवून पुढे जात असेल तर त्याला आपोआप प्रगतीपासून बाजूला करुन त्याला त्याची आदिवासीपणाची जाणीव करुन दिली जाते. आदिवासी साहित्यिकांनी हे स्वीकारुन एकलव्याप्रमाणेच इतरांना जे व्यवस्थेचे बळी ठरवले, जयांना इतिहासात प्रतिबंध करण्याचा प्रयत्न केलात्यांना केंद्रीयसूत्र मानून आदिवासी साहित्यिकांनी आपले साहित्य लिहिलेले आहे.

एकलव्याप्रमाणेच राणी दुर्गावती यांनाही आदिवासी साहित्यिकांनी केंद्रस्थानी ठेवून आदिवासी साहित्य लिहिल्याचे जाणवते. राणी दुर्गावतीने इंग्रजांविरुध्द आदिवासींच्या स्वातंत्र्यासाठी जो लढा दिलेला आहे तो आजही आदिवासी समाजाला मार्गदर्शक आणि प्रेरणादायी आहे. राणी दुर्गावतीप्रमाणेच नारायणसिंह उडके यांनी आदिवासीसाठी केलेला संघर्ष आदिवासी साहित्याला गतिमान करण्यासाठी महत्त्वाचा असल्याचे दिसून येते.

## आदिवासी समाजाची वैशिष्ट्ये :-

आदिवासी जमात सुसंस्कृत व प्रगत समाजापासून दूर वास्तव्य करुन असते. " आदिवासी समाज दुर्गम व डोंगराळ भागात राहात असल्याने, इतर समाजांपासून अलिप्त राहिल्यामुळे आपले वेगळेपण टिकवून आहे. आजही या जामाती आपल्या परंपरागत रुढी, प्रथा व पंरपरांचे काटेकोर पालन अंधश्रध्देने करताना दिसतात." या जमातींच्या स्वतंत्र बोलीभाषा आहेत. काही विशिष्ट आदिवासी बोली सोडल्या तर या बोलींना लिपी नाही. यांची उत्पादनाची साधने प्राथमिक स्वरुपाची असतात. आदिवासी जीवनामध्ये निसर्गपूजा, जादूटोणा, अंधश्रध्दा मोठ्या प्रमणावर दिसून येता. रुढी, परंपरा, कथा, काव्य, नृत्य, यांद्वारे परंपरांचे ज्ञान पुढील पिढीमध्ये जाते. मेळघाटातील आदिवासी पुरुषांबरोबर, स्त्रियाही जंगलात मिळणाऱ्या मध, फळे, डिंक, मोह इत्यादी वस्तू गोळा करुन व थोड्याफार प्रमाणात शेती करुन आपली उपजीविका करतात. पक्षी व जंगली प्राणी यांच्या शिकारीवर बंदी असली तरी, पक्ष्यांची शिकार अजूनही केली जाते. कांही तुरळक अपवाद सोडले तर जंगली प्राण्यांची शिकार होत नाही. मेळघाटामध्ये साग वृक्षांची कटाई करुन ते आसपासच्या भागांमध्ये विकले जातात. वनखात्याचे कडक लक्ष चुकवूनही हे आदिवासी लोक वृक्षतोड करत आहेत. या शिवाय जंगलामधील गवत, पक्षी, तितर, होला, बटेर, पारवा, कबुतर, मोर, पोपट, बगळे, घोरपड, ससा, रानबोके, रानकोंबडी इत्यादी पशुपक्ष्यांना पकडून त्यांची विक्री जवळपासच्या बाजारांमध्ये केली जाते. आदिवासी स्त्रियांना

अलंकाराचे फार आकर्षण असते. त्यांना भडक रंग फार आवडतात. आदिवासी स्त्रिया अंगावर गोंदवून घेतात. त्यांची घरे बहुदा कुडाच्या भिंती आणि गवताचे छप्पर असलेली, तर काही घरे मातीने लिंपलेली असतात.

## समारोप :-

आदिवासी साहित्य संकल्पना विचारात घेताना निसर्गाच्या आश्रयाने जीवन जगणारा आदिवासी समूह आपल्या जमातीतील आदर्श स्त्री-पुरुषांना आपली प्रेरणा मानून साहित्याची मांडणी करतो. आदिवासी लोकसाहित्यातील न्रत्य, नाट्य, गीत, संगीत आणि वाद्ये यांची पार्श्वभूमी घेऊन येणाऱ्या आदिवासी साहित्यात आदिमतेची समृध्द वैशिष्ट्ये अभिव्यक्त होतात. वन्य पर्यावरणाशी एकरुप होऊन जगणारा, शेतीनिष्ठ जपणारा, कष्टाळू आदिवासी जीवनातील करुणा आणि समाधान या संवेदना स्वीकारुन जीवन जगतो आणि त्याच्या संवेदना तो साहित्यात मांडतो.

आदिवासी साहित्यिक आपल्या साहित्याची मांडणी करताना सामाजिक जीवन जाणिवांच्या आशयात आदिवासी समाजाच्या व्यथा, वेदना, विद्रोह, दुःख, दारिद्रय, ताण-तणाव, संघर्ष, भूक, लुबाडणूक, प्रेम, ढोंगीपणा, हक्कवाद, परिवर्तन, सांस्कृतिक वैभव, रुढी-परंपरा, अज्ञानातून निर्माण झालेल्या अंधश्रध्दा, रोजचे भयावह प्रश्न आणि समस्या यांची दखल घेतात, स्वतः उन्हात उभा राहून दुसऱ्याची सावली बनणारा परंतु आपणाला मानवतेने वागविले जात नाही, ही त्याची खंत आहे. जंगलाला देव मानून संवर्धन करणाऱ्या आदिवासींवर जंगल कायदा ताडला म्हणून खोटे आरोप दाख्ल करुन शिक्षा सुनावली जाते. भांडवलदार, व्यापारी जंगलाचा विध्वंस करतात हे आदिवासीला पाहवत नाी, तेव्हा तो दुःखी होताना दिसतो. निसर्ग आणि आदिवासी यांच्यातील परंपरागत आदिम नाते जपणारा मानवी समूह मराठी साहित्यातून आपले समृध्द जीवन व्यक्त करुन आपलीही मराठी साहित्याने दखल घ्यावी, अशी आशा व्यक्त करतो. एकूणच आदिवासी साहित्याच्या प्रेरणा, स्वरुप आणि वैशिष्ट्ये यांचा विचार करता मराठी साहित्यामध्ये आदिवासी साहित्य आपले स्वतंत्र अस्तित्व दर्शविते.

## निष्कर्ष :-

आदिवासीमधील नवे साहित्येक, लेखक, कवी, नाटककार पुढे आले पाहिजेत. आजचे आदिवासी साहित्य समाजात नवा विचार, नवी दिशा देवू शकते ही भावना रुजवली पाहिजे. आदिवासी समाज आणि सांस्कृतीची मर्मस्थळे आदिवासी समाजात होणारे बदल, समाज परिवर्तनाची दिशा, आदिवासीची घालमेल, आदिवासीचे स्वतंत्र अस्तित्व प्रस्थापित करण्याची धडपड, अन्याय, अत्याचाराचा प्रतिकार करण्याची संघटन आणि संघर्ष करण्याची धडपड, पूर्वीचे शोषण जावून नवे आलेले शोषणाचे स्वरुप साहित्याच्या माध्यमातून बदले पाहिजे. आदिवासी साहित्य संमलेनात नवोदित्य साहित्यकांना आपले विचार माडण्याची संधी दिली पाहिजे. त्यांचे सुख-दुःख जाणून घेण्याचा प्रयत्न केला पाहजे. त्यांच्यावर झालेल्या अन्यायाने पेटवून उठले पाहिजे व त्यांच्या लढ्यात सहभागी झाले पाहिजे. आदिवासींच्या पारंपरिक सांस्कृतिने मानवी जीवनात आनंद निर्माण केला आहे तो वृंध्दीगत करण्याचा प्रयत्न केला पाहिजे व त्यांच्या जीवनात चैतन्य निर्माण केला पाहिजे.

## संदर्भ ग्रंथ


१) आदिवासीचे शिक्षण- डॉ. गोविंद गारे, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.
२) आदिवासी साहित्य स्वरुप आणि समिक्षा- डॉ. विनायक तुमराम, प्रतिमा प्रकाशन, पुणे.
३) आदिवासी साहित्य संपादक- प्राचार्य डॉ. धनाजी गुरव, वाङ्मय सेवा प्रकाशन, नासिक.
४) आदिवासी साहित्याची पार्श्वभूमी समस्यां व अव्हाने- डॉ. सुवर्णा गाडगे, (अक्षरवैदभी नियतकालीक)
५) माझी काटेमुंढरीची शाळा- गो.ना. मुनंघाटे- साधना प्रकाशन, पुणे.